CNR NO.MHST120004132021

# निशाणी क्र.५५ खाली आदेश

(पारित दिनांक ०२/०५/२०२६)

प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ मधील आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे.

२) प्रतिवादी क्र. ५ यांनी अर्जामध्ये कथन केले की, सदर वादीने प्रतिवादी विरुध्द प्रस्तुतचा दावा दावा मिळकतीचे वाटप व जाहीर ठराव होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर प्रतिवादी क्र. ५ ते ७ च्या वतीने कैफियत देतेवेळी नजर चुकीने खालील मजकूर कैफियतीमध्ये समाविष्ट करणेचा राहून गेला आहे. तरी कैफियत कलम ३ संपल्यानंतर ३अ असा आकडा टाकून खालील मजकुर समाविष्ट करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

३अ) " सदर वादींनी दिलेली वंशावळ ही चुकीची व अपुरी दिली आहे. कोण कधी मयत झाला याचा दाव्यात उल्लेख केलेला नाही. वादीने येसाबाई हिचे वारस दाव्यात सामील केले नाहीत. तसेच रामाचा मुलगा तानाजी हा मयत असून त्याचे वारस दाव्यात सामील केले नाही. तसेच रामचा मुलगा तानाजी हा मयत असून त्याचे वारस दाव्यात सामील केलेले नाहीत. तसेच दाव्यातील मिळकतीमधील सहहिस्सेदार यांना या दाव्यात सामील केले नाही. शिवाय वादी व प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे नावे घर मिळकती आहेत. त्या कायद्याचे दृष्टीने दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने दाव्यास आवश्यक ते पक्षकार व मिळकती सामील केले नसलेमुळे दाव्यास Non–Joinder of Necessary parties and properties या तत्वाची बाधा येते. त्यामुळे सदररचा दावा रद्द होणेस पात्र आहे. तसेच वडिलार्जीत मिळकती कोणत्या व वादीच्या एकत्र कुटूंबातील खरेदीच्या कोणत्या हे वादींनी दाव्यात नमूद केले नाही. तसेच वादीच्या मागणीनुसार गट नं. ३९५ मधील खरेदीखत सन २५/१०/१९६२ रोजी व दि. ०७/१२/१९८३ व दि. ३०/०३/१९९३ रोजीच्या खरेदी घेतलेल्या दस्ताबाबत जाहीर ठराव आता

मागता येणार नाही. त्यास मुदतीच्या कायद्याची बाधा येते. त्यामुळे दावा या मुदयावर रद्द होण्यास पात्र आहे. तसेच वादीने दस्त कायदेशीर ठरवून मागितला असून त्यावर योग्य तो स्टॅप वादींनी दिला नाही. त्यामुळे वादीचा दावा या मुद्यावर रद्द होण्यास पात्र आहे”. सदर मजकुर दाव्यात समाविष्ट झालयाने दाव्याचे स्वरुपात बदल होत नाही. वादीचे कोणतेही नुकसान होत नाही. त्यामुळे सदरची दुरुस्ती होणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी, प्रतिवादी यांचेतील वाद कायमस्वरुपी निकाली निघणार आहे. तरी सदरची दुरुस्ती मान्य करण्याची विनंती केलेली आहे.

३) सदर दाव्यातील वादी यांनी सदर अर्जावर आपले म्हणणे देवून सदरचा अर्ज चुकीचा, लबाडीचा व कायद्याला धरुन नसल्यामुळेतो वादीस मान्य व कबून नसल्याचे कथन करुन पुढे असे कथन केले आहे की, प्र.वादीने दावा संपुर्ण वाचलेला नाही. प्रतिवादीने ज्यासाठी दुरुस्ती मागितली आहे ते सर्व पक्षकार दाव्यात सुरुवातीपासुनच दाखल आहेत. तसेच येसाबाईचा सदर दावा मिळकतीत काहीही हक्क संबंध नाही. त्यांच्या सर्वांच्यामध्ये पुर्वीच वाटप झाले असुन फक्त बाळा आबा मदने यांच्या असलेल्या १/३ हिश्श्याचे वाटप मागण्याचे आहे. त्यामुळे येसाबाई अगर इतर लोकांना सदर दाव्यामध्ये दाखल केलेले नाहीत. त्याबाबत वादीने दावा कलम ३ मध्ये सविस्तरपणे लिहलेले आहे. त्या मुद्यांसाठी सदरची दुरुस्ती मागता येणार नाही. दावा मिळकती ह्याच खरेदीच्या सुध्दा आहेत व वडिलार्जित सुध्दा आहेत. काहीमध्ये खरेदीचा हिस्सा मिळाला पण वडिलार्जीत मध्ये मिळालेला नाही. तसेच काही वडिलार्जीत मिळकतीमध्ये हिस्सा मिळाला तर काही खरेदी मध्ये हिस्सा मिळालेला नाही. ते सर्व गट म्हणजे दावा मिळकत आहे. म्हणुन त्यासाठी दावा केलेला आहे. खरेदी घेतलेल्या मिळकतीतच वडिलार्जित हिस्सा समाविष्ट केला आहे. त्यामुळे वादीच्या हिश्श्याला क्षेत्र कमी लागले आहे. त्यामुळे खरेदी व वडिलार्जीत मिळकती नमुद नाहीत या मुद्यांवर प्र. वादील दुरुस्ती मागता येणार नाही. सदरचा दावा हा जाहीर ठराव व वाटपाचा आहे ताकीदीचा नाही. त्यामुळे त्याला मुदतीच्या कायद्याची बाधा येत नाही. त्यामुळे त्या मुद्यांवर प्र. वादीला आता दुरुस्ती मागता येणार नाही.

४) वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादीने दावा कलम ११ मध्ये वादी व प्र. वादींच्या वडिलार्जीत मालकीचे घर नाही. जी घरे आहेत ती वादी व प्र.वादींनी स्वखर्चाने बांधलेली आहेत असे

लिहलेले आहे. प्र.वादीने केवळ मोघम स्वरुपात सहहिस्सेदार व आवश्यक मिळकती दाव्यात सामील केल्या नाहीत म्हणुन दाव्यास "आवश्यक पक्षकार व आवश्यक मिळकती" या तत्वाची बाधा येते त्यामुळे दुरुस्ती मागितली आहे. परंतु त्याबाबत कोणताही पुरावा सोबत जोडला नाही. सह हिस्सेदार कोण त्यांची नावे लिहलेली नाहीत. तसेच वडिलार्जीत घराचा उतारा दाखल केलेला नाही. त्यामुळे केवळ मोघम स्वरुपात कैफीयत दुरुस्ती करुन मागता येणार नाही. त्याबाबतही वादी दाव्यामध्ये स्पष्टपणे नमुद केलेले आहे. त्यामुळे या मुद्यांवर प्र. वादीला कैफीयत दुरुस्ती मागता येणार नाही. सदर दाव्यावर वादीने योग्य तो कोर्ट फी स्टॅम्प दिलेला आहे. स्टॅम्प कमी आहे म्हणुन दावा काढुन टाकता येत नाही. प्र.वादीने पुरावा देवुन स्टॅम्प कमी आहे हे शाबीत केले पाहिजे व मा. कोर्टास निदर्शनास आल्यास की, स्टॅम्प कमी आहे तर वादी तो भरण्यास केंव्हाही तयार आहे त्यासाठी कैफीयत दुरुस्त करण्याची आवश्यकता नाही. सदरचा दावा हा चौकशीवर असुन प्र. वादीचा पुरावा देणेवर आहे. त्यामुळे या दाव्याच्या टप्प्यावर प्र. वादीला कोणतीही दुरुस्ती मागता येणार नाही ती कायद्याला धरुन नाही. मा. ना. मुंबई हायकोर्टाने दावा चौकशीला / पुराव्याला आल्यानंतर दाव्यामध्ये अगर कैफीयतीमध्ये दुरुस्ती करता येणार नाही म्हणुन सांगितले आहे. त्याबाबत मा. ना. मुबई हायकोर्टचा केस दाखला सुध्दा आहे. त्यामुळे प्र. वादीने कैफीयत दुरुस्तीसाठी दिलेला अर्ज नामंजुर करणेत यावा. प्रतिवादीतर्फे साक्षीदार देण्यासाठी २६/०८/२०२५ रोजी साक्षी समन्स काढले होते त्यानंतर प्रतिवादीने साक्षीदारास स्वतः हजर करतो म्हणुन सांगितले परंतु अद्याप साक्षीदार घेतला नाही. प्रतिवादी केवळ दावा लांबविण्यासाठी प्रयत्न करत आहेत. प्रतिवादीने सन २०२२ मध्ये कैफियत दिलेली आहे. त्यावेळी प्रतिवादीला घराबाबत, पक्षकारांबाबत व मुदतीबाबत कैफियतीत कागदोपत्री पुरावा देवुन मुद्दे मांडता आले असते परंतु चार वर्षांनी व दावा चौकशीवर असतांना दिलेली कैफियत दुरुस्ती ही कायद्याला धरुन नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

५) दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की वादीने सदरचा दावा हा प्रतिवादी याचे विरुध्द दावा मिळकतीचे वाटप व जाहीर ठराव होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील प्रस्तावित दुरुस्ती पाहता दाव्याच्या विनंती कलमाच्या

व कथनाच्या अनुषंगाने वंशावळीमध्ये वादीने मयत तानाजी याचे वारस दाव्यात सामील केलेले नाहीत. तसेच वंशावळीत येसाबाई हिचे वारस यांना दाव्याकामी सामील केलेले नाही व ते दावा हा वाटपाचा असल्याने दाव्यास आवश्यक पक्षकार आहेत या कारणाकरीता सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सदरकामी वादीचा पुरावा संपलेला असून प्रतिवादीच्या पुराव्यासाठी दावा प्रलंबीत आहे. प्रतिवादीचा सदरचा अर्ज मंजूर केल्यास वादीस प्रतिवादीचा उलटतपास घेण्याची संधी मिळणार आहे. सदर प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही.

६) वर नमूद बाबींची व संचिकेचे अवलोकन करता प्रस्तुत दुरुस्तीमुळे दाव्याच्या अंतिम निकालावर निर्माण होणाऱ्या उभय पक्षकारांतील वादप्रश्नांचे निरसन होण्यास मदत होईल. सदर दावा हा पुराव्याकामी प्रलंबीत असताना सदरचा अर्ज दाखल करण्यास केलेला विलंब पाहता, वादीचा सदरचा अर्ज दंडासहीत मंजूर करणे योग्य ठरेल व खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) प्रतिवादी क्र. ५ चा नि.क्र.५५ वरील अर्ज र.रु.१०००/– (एक हजार रुपये फक्त) दंड भरण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) सदरची दंडाची रक्कम प्रतिवादी क्र. ५ यांनी वादी यांना देववावी.

३) प्रतिवादी क्र. ५ ने विनंती केल्याप्रमाणे दुरुस्ती १४ दिवसांचे आत करुन घ्यावी.

SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Digitally signed by SHEETAL SHIVAJI SALUNKHE
Date: 2026.05.02 16:10:06 +0530

( एस.एस.साळुखे )

दिनांक ०२/०५/२०२६ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, म्हसवड